Vidya Prasarak Mandal

Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha

## Department of Physics










### Saluting our Indomitable NariShakti on International Women's Day 2021

International women's day is celebrated on 8th March around the world. It is a global day celebrating the social, economic, cultural and political achievements of women. Department of Physics had celebrated this great day to pay tribute to the incredible ladies over the globe. We thought that on this admirable occasion, very woman, every girl, should experience the inner strength and happiness. Hence, we were tried to make this day memorable one by organizing some interesting competitions for our UG girls. Following were the competitions organized –

a) Rapid Fire of some Challenging Questions
b) Jewellery making from Paper and Paint

We got overwhelming response from the girls. More than 78 girls were participated in the program. 50 brain activating questions were asked to the girls and they had shown enthusiasm in answering these questions. Certificates were issued to all the participants. Paper Jewellery Making was another competition organized to impel the artistic skills among the girls.

Vidya Prasarak Mandal

Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha



This certipicate is presented to

..............................................................

for her active participation in "Rapid Fire of Funny Questions" organised by Department of Physics on the occasion of International Women's Day held on 8th March 2021.

| Miss. Dhanshree Kothekar<br>Assistant Professor<br>Deptt. of Physics | Dr. Kishor Hurde<br>Professor and Head<br>Deptt. of Physics | Dr. Vilas Raut<br>Principal<br>Mungasaji Maharaj Mahavidyalaya |
|---|---|---|



# दारव्हा येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**दारव्हा** ■ मुंगसाजी महाराज महाविद्यालयात वसंत घुईखेडकर, व सचिव डॉ. सौ. संगीत घुईखेडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली भौतिकशास्त्र विभागाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन केले.

विज्ञान शाखेतील मुलींसाठी ऑनलाईन 'रैपिड फायर ऑफ चैलेंजिक क्वेश्चन' या खेळाते ७८ विद्यार्थीनींनी यामध्ये सहभाग नोंदविला. कार्यक्रमात बुद्धिला चालना देणारे तब्बल ५० प्रश्न विचारले गेले आणि मुलींनी प्रत्येक प्रश्नाला अतिशय उत्फूर्त असा प्रतिसाद दिला. सर्व सहभागी विद्यार्थीनींना प्रमाणपत्र बहाल करण्यात आले. विद्यार्थीनींमध्ये हजर जबाबी वृत्ती विकसित व्हावी या अनुषंगाने कु. धनश्री कोठेकर, सहाय्यक प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यांना प्राचार्य डॉ. विलास राऊत, विभाग प्रमुख डॉ. किशोर हुरडे व आय.क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. प्रशांत बागेश्वर यांची विशेष मदत लाभली. तसेच महिला दिनाचे औचित्य साधून, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळणे हेतू, भौतिकशास्त्र विभागाने 'पेपर ज्वेलरी मेकिंग' स्पर्धेचे देखील आयोजन केले होते. सहभागी विद्यार्थीनींना कागदी दागदागिने बनवून त्याचे छायाचित्र प्रस्तुत करावयाचे होते. सौ. संगीता घुईखेडकर यांनी सदर स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेत कु. अनुश्री गजानन तायडे, कु. चेतना संजय दाढे, कु. गायत्री विनोद नांदेकर व कु. साक्षी किशोर राठोड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. (श.प्र.)









## *आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२१*

### *कागदापासून दागिने बनवणे*

### निकाल पत्रिका

| अनुक्रणिका | स्पर्धकांचे नाव | वर्ग | पारितोषिक |
|---|---|---|---|
| १. | कु. अनुश्री गजानन तायडे | बी. एस्सी. भाग २ | प्रथम पारितोषिक |
| २. | कु. चेतना संजय दाढे | बी. एस्सी. भाग २ | द्वितीय पारितोषिक |
| ३. | कु. गायत्री विनोद नांदेकर | बी. एस्सी. भाग २ | तृतीय पारितोषिक |
| ४. | कु. साक्षी किशोर राठोड | बी. एस्सी. भाग ३ | उत्तेजनार्थ पारितोषिक |

परिक्षकः सौ. संगीताताई घुईखेडकर


विद्या प्रसारक मंडळ
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि
कु. अनुश्री गजानन तायडे बी. एस्सी. भाग २
हिने भौतिकशास्त्र विभागाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ८ मार्च २०२१ रोजी आयोजित केलेल्या 'कागदापासून दागिने बनवणे' या स्पर्धेत **प्रथम पारितोषिक** पटकाविले.

कु. धनश्री कोठेकर
प्रभारी प्राध्यापक
भौतिकशास्त्र विभाग

डॉ. किशोर हुरडे
विभागप्रमुख
भौतिकशास्त्र विभाग

डॉ. विलास राऊत
प्राचार्य
मुंगसाजी महाराज महाविद्यालय

डॉ. संगीता ताई घुईखेडकर
सचिव
विद्या प्रसारक मंडळ

लोकमत

# दारव्हा येथे विद्यार्थिनींच्या विविध स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**दारव्हा :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विद्यार्थिनींमध्ये हजरजबाबी वृत्ती निर्माण व्हावी, याकरिता विज्ञान शाखेतील मुलींसाठी 'रॅपिड फायर ऑफ चॅलेंजिक क्वेश्चन' हा खेळ घेण्यात आला. बी.एस्सी. भाग १, २, ३ मधील ७८ विद्यार्थिनींनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात बुद्धीला चालना देणारे तब्बल ५० प्रश्न विचारले गेले. मुलींनी प्रत्येक प्रश्नाला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्व सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात करण्यात आले.

विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या हेतूने भौतिकशास्त्र विभागाने 'पेपर ज्वेलरी मेकिंग' स्पर्धादेखील घेतली. सहभागी विद्यार्थिनींना कागदी दागदागिने बनवून त्याचे छायाचित्र प्रस्तुत करावयाचे होते. या स्पर्धेत अनुश्री गजानन तायडे, चेतना संजय दाढे, गायत्री विनोद नांदेकर व साक्षी किशोर राठोड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिक पटकाविले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बसंतराव घुईखेडकर, सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांच्या मार्गदर्शनात उपक्रम राबविण्यात आला. प्राचार्य डॉ. विलास राऊत, विभागप्रमुख डॉ. किशोर हुरडे व आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रशांत बागेश्वर यांच्या सहकार्याने भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा.धनश्री कोठेकर यांनी आयोजन केले होते.

Hello Yavatmal
Page No. 3 Mar 23, 2021
Powered by: erelego.com

# मुंगसाजी महाविद्यालयात विविध स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

दारव्हा, ता. २२ : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय भौतिकशास्त्र विभागातर्फे विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

विज्ञान शाखेतील मुलींसाठी ऑनलाइन 'रॅपिड फायर ऑफ चॅलेंजिक क्वेश्चन' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. बीएससीमधील सुमारे ७८ विद्यार्थिनींनी यामध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी बुद्धीला चालना देणारे तब्बल ५० प्रश्न विचारण्यात आले होते. सहभागी मुलींनी प्रत्येक प्रश्नाला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थीनींमध्ये हजर जबाबी वृत्ती विकसित व्हावी या अनुषंगाने प्रा. धनश्री कोठेकर यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी प्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. किशोर हुरडे, डॉ. प्रशांत बागेश्वर यांची विशेष उपस्थित होती. या सोबतच महिला दिनाचे औचित्य साधत, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा हेतूने 'पेपर ज्वेलरी मेकिंग' स्पर्धेचे देखील आयोजन यावेळी केले होते. यावेळी सहभागी विद्यार्थिनींनी कागदी दागदागिने बनवून त्याचे छायाचित्र ता १७ मार्च पर्यंत प्रस्तुत करावयाचे आवाहन केले होते. डॉ. संगीता घुईखेडकर यांनी सदर स्पर्धे चे परीक्षण करीत विजयी विद्यार्थिनींची नावे घोषित केली.



दारव्हा : पेपर ज्वेलरी मेकिंग स्पर्धेत विद्यार्थिनींनी बनविलेले कागदी दागिने.

त्यामध्ये अनुश्री तायडे प्रथम, चेतना दाढे द्वितीय, गायत्री नांदेकर तृतीय, तर साक्षी किशोर राठोड हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले.